## सिडको गृहनिर्माण योजनेतील अर्जदारांनी थकीत रक्कमेचा विलंब शुल्कासह भरणा करणेबाबत

सिडको संचालक मंडळाचा दिनांक **24/12/2018** रोजीचा ठराव

सिडको महामंडळाने राबविलेल्या गृहनिर्माण योजनेच्या संगणकीय सोडतीत ज्या यशस्वी अर्जदारांनी महामंडळाने निर्धारित केलेल्या विहीत मुदतीच्या आत सदनिकेच्या रक्कमेचा भरणा केलेला नाही, त्या थकीत अर्जदारांना मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडको महामंडळाने घेतलेला आहे.

संचालक मंडळाच्या बैठकीत पारीत करण्यात आलेला ठराव क्र. **12106** दिनांक **24/12/2018** नुसार या अर्जदारांनी थकीत रक्कमेचा भरणा विलंब शुल्कासहीत दिनांक **25/03/2019** पर्यंत करावा, अन्यथा उर्वरित संपूर्ण शिल्लक रक्कमेचा भरणा विलंब शुल्कासह न केल्यास, वाटपपत्र अतिमत: रद्द करण्यात येईल व वाटपपत्रामधील जोडपत्रातील अट क्र. **2** व नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारित) विनिमय-**2008** च्या कलम **14 (i)** मधील तरतुदीनुसार अशी प्रकरणे अतिमत: निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी. उर्वरित अटी व शर्ती वाटपपत्रात नमूद करण्यात आलेल्या आहेत व त्या सर्व अर्जदारांवर बंधनकारक राहतील.

व्यवस्थापक (पणन)-2